MHRT060009562023

**<u>नियमित दिवाणी दावा क्रमांक १४९/२०२३</u>**

**<u>निशाणी क्रमांक ५ खालील आदेश</u>**

**( नितीन यशवंत मोहीते विरुध्द सरपंच, ग्रुप ग्रामपंचायत शिर्दे )**

वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १, २ प्रमाणे तुर्तातुर्त मनाई ताकीदीकरिता प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

२. वादी यांचे कथनानुसार दावा मिळकत ही वादी व इतर सहहिस्सेदार यांचे सामाईक मालकी वहीवाटीची असून सदर वादी यांचे सहहिस्सेदार हे नोकरी व कामधंद्यानिमित्त मुंबई व इतरत्र रहाणेस आहेत. दावा मिळकतीमध्ये वादीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेच्या अनुदानातून सन २००५–२००६ मध्ये विहीर खोदलेली आहे. सदर विहीरीचे पाण्याचा वापर करुन दावा मिळकतीत शासनाच्या फलोत्पादन योजनेचा लाभ घेवून वादी हे नगदी पिके घेतात व सदर मिळकतीतून मिळणारे उत्पन्नाचा वादी व त्यांचे कुटूंबिय यांना उदरनिर्वाहाकरीता आर्थिक मदत होत आलेली आहे. अशी वस्तूस्थिती असताना दावा मिळकतीपैकी ०–०१–० आर एवढ्या क्षेत्राचे वादी यांचे सहहिस्सेदार यांचेकडून बेकायदेशिरपणे दिनांक २७/१/२०२३ रोजी जिल्हा परिषद रत्नागिरी यांचेकरीता गटविकास अधिकारी पंचायत समिती दापोली यांनी बक्षिसपत्र करुन घेतलेले आहे. सदरचे बक्षिसपत्राचे संदर्भात उपविभागीय अधिकारी दापोली यांनी परवानगीकरीता दिनांक ०३/१०/२०२२ व ०४/०१/२०२३ रोजी घालून दिलेल्या अटीप्रमाणे पुर्तता केलेली नसल्याने सदरच्या परवानग्या रद्द झालेल्या आहेत. त्यामुळे सदरचे बक्षिसपत्र हे बेकायदेशिर आहे.

**३.** वादी यांचे पुढे असे कथन आहे की, दावा मिळकतीबाबत वादी व त्यांचे सहहिस्सेदार यांचे दरम्यान अद्याप वाटप झालेले नसल्याने दावा मिळकत ही समाईकांत आहे व दावा मिळकतीच्या इंचा इंचावर वादी व त्यांचे सहहिस्सेदार यांची सामाईक मालकी आहे. त्यामुळे दिनेश शांताराम मोहीते, गणेश शांताराम मोहीते, भारत शांताराम मोहीते व सुगंधा शांताराम मोहीते यांना दावा मिळकतीचे हस्तांतर करता येणार नाही. असे असताना प्रतिवादी हे बेकायदेशिर बक्षिसपत्राचा आधार घेवून दावा मिळकती लगत असलेल्या नैसर्गिक पानवठ्या शेजारी जलजिवन योजनेअंतर्गत नविन विहीरीचे खोदकाम करत आहेत हे वादी यांना समजताच वादी यांनी प्रतिवादी यांचेविरुध्द तक्रारअर्ज दिलेला होता. प्रतिवादी हे सुमारे ४ ते ५ गुंठे क्षेत्रामध्ये खोदकाम करत आहेत व सदर विहीरीचे कामाचे अनुषंगाने वादीच्या बागायती जवळ असलेल्या पोलवरुन बेकायदेशिरपणे आकडा टाकून वीज घेतेवेळी स्पार्कींग होउन दावा जमिनीत आग लागून वादीचे काजू व इतर झाडांचे नुकसान झाले. त्याबाबतही वादीने दिनांक ३०/५/२०२३ रोजी लेखी तक्रार दिलेली होती.

**४.** वादी व त्यांचे सहहिस्सेदार हे नोकरी निमीत्त बाहेरगावी असल्याचा गैरफायदा घेवून प्रतिवादी हे दावा मिळकतीतून बेकायदेशिरपणे खोदलेल्या विहीरीतून पाणी खेचून घेणेकरीता पाईपलाईन करण्याकरीता दावा जमीन मिळकतीपर्यंत पाईपलाईन करुन दावा मिळकतीमध्ये खोदकाम करु लागले आहेत. तसेच वीजजोडणी करण्याकरीता दावा मिळकतीत सात ते आठ विजेचे पोल रोवून वीजकनेक्शन घेतले जाईल. त्यामुळे वादी यांचे मालकीचे दावा जमीन मिळकतीचे नुकसान होणार आहे. तसेच दावा मिळकतीत प्रतिवादी यांनी खोदलेल्या विहीरीतून गावातील लोकांचे दैनंदिन वापराकरीता पाण्याचा दररोज उपसा झालेस वादी यांचे मालकीचे विहीरीतील पाणी आटणार आहे. त्यामुळे वादीची बागायत सुकून जाणार आहे व

तसे झाल्यास वादीचे कधीही भरुन न येणारे असे नुकसान होणार आहे. म्हणून प्रस्तुतचा अर्ज हा वादीने प्रतिवादी यांचेविरुध्द तुर्तातुर्त ताकीदीकरीता केलेला आहे.

५. प्रतिवादी यांनी निशाणी क्रमांक १८ येथे प्रस्तुत अर्जास म्हणणे व दाव्याची कैफियत दाखल करुन वादीचे कथन नाकारलेले आहे. प्रतिवादीचे कथनानुसार वादी दाव्यामध्ये दावा मिळकतीच्या स्वरुपाबाबत करत असलेली कथने ही अधिकार अभिलेखाच्या विरुध्द आहेत. वस्तूस्थितीनुसार यशवंत, शांताराम व धनाजी यांच्या कुटूंबाच्या दावा मिळकतीच्या अभिलेखाला नमुद केलेल्या क्षेत्राप्रमाणे हद्दरेषा ठरवून त्याप्रमाणे ज्याचे त्याचे क्षेत्रात ज्याची त्याची स्वतंत्र कब्जेवहिवाट आहे व त्याप्रमाणे प्रत्येकजण विभक्तरित्या वहीवाट करत आहेत. प्रतिवादीने कैफियतीसोबत जोडलेल्या हातनकाशामध्ये प्रत्येकजण कशाप्रकारे विभक्तरित्या वहीवाट करत आहे याबाबत वस्तुस्थिती नमूद केलेली आहे. त्याप्रमाणे नकाशात ABCDEFA या अक्षराने नमुद केलेले क्षेत्र बबन धनाजी मोहीते वगैरे यांच्या ४ आणे हिश्याचे असून त्यामध्ये त्यांची प्रत्यक्ष कब्जेवहीवाट आहे. तसेच नकाशामध्ये FEDKJIHGF या अक्षराने नमूद क्षेत्र हे गणेश मोहीते वगैरे यांचे ४ आणे हिश्याचे क्षेत्र असून त्याप्रमाणे त्यांची प्रत्यक्ष कब्जेवहीवाट आहे. सदर क्षेत्रातील एक गुंठे क्षेत्र सदर कुटूंबाने गणेश यांचे करवी जिल्हा परिषद रत्नागिरी यांना बक्षिसपत्राने दिलेले आहे व त्या ठिकाणी जलजिवन योजनेनुसार विहीर खणून झाली असून सदर विहीरीचे काम हे पूर्ण झाले असून त्याकरीता रक्कम रुपये २४,६७,७६८/– एवढा खर्च आलेला आहे. सदर क्षेत्रातून बौध्दवाडी पाणवठा ते गोवलेवाडी जाणारी पायवाट आहे व वादी करत असलेली जलजिवन योजनेची पाण्याची पाईपलाईन सदर पायवाटेच्या तीन फुट खोल जमिनीखालून जाणारी आहे. सदर पायवाटेच्या कडेने विजेचे पोल उभे करुन विजपुरवठा सदर पाणी योजनेसाठी केला जाणार आहे. सदर संपूर्ण जलजिवन

योजनेचे काम हे बक्षिसपत्र देणार श्री. गणेश शांताराम मोहीते यांच्या हिश्याचे व वहीवाटीचे क्षेत्रातून केले जात आहे. असे असताना वादी खोटा व खोडसाळ दावा व अर्ज करुन सार्वजनिक योजनेस हरकत अडथळा करत आहे.

**६.** प्रतिवादी यांचे पुढे असे कथन आहे की, प्रतिवादी कथन करत असलेल्या योजनेकरीता रक्कम रुपये १,०१,९८,०१६/– इतका निधी मंजूर करण्यात आला आहे. त्याप्रमाणे शासन मान्यता होवून जलजिवन मिशन ही जिल्हाधिकारी यांचे अधिपत्याखाली जिल्हा परिषदेमार्फत राबविली जात आहे. मौजे वळणे गावात सदर जलजिवन योजनेचे काम सुरु होवून वर नमूद विहीरीचे खर्चासह रक्कम रुपये सत्तर ते पंचाहत्तर लाख रुपयांपर्यंतचे काम पूर्णत्वास गेले आहे. सदर योजनेचे काम मार्च २०२४ अखेर पूर्ण करण्याचे बंधन कंत्राटदार यांचेवर आहे. सदर योजनेचे सर्व ग्रामस्थ हे लाभधारक आहेत. संपूर्ण वस्तुस्थिती ही वादी यास तो गावचा पोलीस पाटील असल्याने त्याला माहीत असतानाही केवळ स्वतःच्या स्वार्थापोटी सार्वजनिक हिताच्या योजनेमध्ये वादी हा हरकत अडथळा आणू पहात आहे असे कथन करुन प्रस्तुतचा अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती प्रतिवादी यांनी केलेली आहे.

**७.** दोन्ही वकीलांचा युक्तीवाद व त्यांनी दाखल केलेल्या कागदोपत्री पुराव्यावरुन पुढील मुद्दे उपस्थित होतात, त्यावरील माझे निष्कर्ष व कारणमिमांसा पुढीलप्रमाणे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादीने सकृतदर्शनी केस असल्याचे शाबीत केले आहे काय ? | नाही. |
| २. | तुर्तातुर्त ताकीदीचा अर्ज नामंजूर झालेस वादींचे कशानेही न भरुन येणारे नुकसान होईल असे वादींनी शाबीत केले आहे काय ? | नाही. |
| ३. | न्यायाचा समतोल वादींचे बाजूने आहे, असे वादींनी शाबीत केले आहे काय? | नाही. |

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| ४. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

### मुद्दे क्र.१ ते ३ करिता –

८. विवेचनाची पुनरावृत्ती टाळण्यासाठी मुद्दे क्र.१ ते ३ ची न्यायचिकित्सा एकत्रीत करण्यात येत आहे.

९. तुर्तातुर्त मनाई हुकुम मंजुरीकरीता वादीनी प्रथमदर्शनी दावा, अनुकलतेचा कल व अपूर्णणीय नुकसान या तीन पूर्वशर्ती सिध्द करणे आवश्यक आहेत.

१०. वादी यांच्या कथनानुसार दावा मिळकत ही वादी व इतर सहहिस्सेदार यांचे सामाईक मालकी वहिवाटीची आहे. दावा मिळकतीपैकी ०–०१–० आर एवढे क्षेत्र वादी यांचे सहहिस्सेदार दिनेश शांताराम मोहीते, गणेश शांताराम मोहीते, भारत शांताराम मोहीते व सुगंधा शांताराम मोहीते यांनी जिल्हा परिषद रत्नागिरी यांना बक्षिसपत्राने दिनांक २७/१/२०२३ रोजी दिलेले आहे. सदरचे बक्षिसपत्र करुन देतेवेळी दावा मिळकतीतील सह हिस्सेदारांची संम्मती घेतलेली नाही. तसेच उपविभागीय अधिकारी दापोली यांनी घालून दिलेल्या अटी शर्तीचे पालन केलेले नाही. त्यामुळे सदरचे बक्षिसपत्र हे बेकायदेशिर आहे. प्रतिवादी यांनी सदर बक्षिसपत्राचा आधार घेवून वादी व इतर सहहिस्सेदारांच्या संम्मतीशिवाय दावा मिळकतीमध्ये असलेल्या नैसर्गिक पानवठ्याशेजारी जलजिवन योजनेअंतर्गत नविन विहीरीचे खोदकाम सुरु केल्याचे समजताच प्रतिवादीने त्याबाबत हरकत घेतली होती. प्रतिवादी यांनी दावा मिळकतीत बेकायदेशिर खोदलेल्या विहीरीतून पाणी खेचून घेण्याकरीता

पाईपलाईन करण्याकरीता दावा मिळकतीत वादी व इतर सहहिस्सेदारांच्या संम्मतीशिवाय खोदकाम करत आहेत. तसेच विहीरीचे पाणी उपसा करण्याकरीता दावा मिळकतीत पंपशेड बांधण्याकरीता चिरे घेवून आलेले आहेत. तसेच दावा मिळकतीमध्ये सुमारे सात ते आठ विजेचे पोल रोवून वीजकनेक्शन घेणेच्या प्रयत्नात आहेत.

**११.** याउलट प्रतिवादी यांनी वादीची कथने नाकारलेली आहेत. प्रतिवादी यांचे कथनानुसार दावा मिळकतीच्या रेकॉर्डनुसार यशवंत, शांताराम व धनाजी यांच्या कुटूंबियांच्या नावासमोर त्यांचे हिश्याचे क्षेत्र नमुद केलेले आहे व त्याप्रमाणे त्यांच्या वहीवाटीत असलेले स्वतंत्र क्षेत्र अधिकार अभिलेखात नमूद असल्याचे दिसून येते. तसेच ज्याच्या त्याच्या स्वतंत्र वहिवाटी असल्याचे व त्याप्रमाणे प्रत्येकजण विभक्तरित्या वहीवाट करत आहेत. त्यानुसार गणेश शांताराम मोहीते व त्यांच्या कुटूंबियांनी त्यांच्या वहिवाटीस असलेल्या क्षेत्रापैकी एक गुंठा क्षेत्र जिल्हा परिषद रत्नागिरी यांना बक्षिसपत्राने दिलेले असून त्याप्रमाणे जिल्हा परिषद रत्नागिरी यांनी सदर ठिकाणी जलजिवन योजनेनुसार विहीर खोदलेली आहे व सदर विहीरीचे काम पूर्ण झालेले आहे. दावा मिळकतीतून बौध्दवाडी पाणवठा ते गोवलेवाडी अशी जाणारी पायवाट आहे. सदरची पायवाट ही गाव नमुना नंबर २३ प्रमाणे आहे. जलजिवन योजनेची पाण्याची पाईपलाईन सदर पायवाटेच्या तीन फुट खोल जमिनीखालून जाणारी आहे. सदर पायवाटेच्या कडेने विजेचे पोल उभे करुन सदर पाणी योजनेकरीता वीजपुरवठा केला जाणार आहे.

**१२.** वादी व प्रतिवादी यांच्यामधील वाद पहाता दावा मिळकतीतील एक गुंठा क्षेत्र हे गणेश शांताराम मोहीते व त्यांच्या कुटूंबियांनी जिल्हा परिषद रत्नागिरी यांना जलजिवन योजनेअंतर्गत विहीरीकरीता बक्षिसपत्राने दिलेली आहे ही बाब उभयपक्षांना मान्य आहे. वादीने

दावा मिळकतीबाबत अद्याप वाटप झाले नसल्याने इतर सहहिस्सेदारांच्या संम्मतीशिवाय गणेश शांताराम मोहीते वगैरे यांनी करुन दिलेले सदरचे बक्षिसपत्र हे बेकायदेशिर आहे त्यामुळे प्रतिवादींना त्याबाबत कोणतेही हक्क प्राप्त होत नाहीत असे कथन करुन सदरचे बक्षिसपत्र व त्याद्वारे प्रतिवादी यांची असलेली वहिवाट आव्हानीत केलेली आहे. दावा मिळकतीबाबत वाटप झाले नसल्याचे व दावा मिळकत ही वादी व इतर सहहिस्सेदारांच्या सामाईक कब्जेवहिवाटीत असल्याचे प्रथमदर्शनी शाबीत करण्याची जबाबदारी वादीची आहे.

**१३.** वादीने त्याच्या कथनाच्या पृष्ठ्यर्थ निशाणी ७/१ येथे दावा मिळकतीचा सात बारा उतारा दाखल केलेला आहे. सदर सात बारा उता–याचे अवलोकन केले असता यशवंत मोहीते यांचे वारस म्हणजेच वादी व त्यांचे कुटूंबिय यांच्या नावे दावा मिळकतीपैकी ८ आणे क्षेत्र म्हणजेच १–७८–० एवढे क्षेत्र सामाईकांत मालकी वहिवाटीत असल्याचे व त्याबाबत त्यांचा स्वतंत्र खातेउतारा अस्तित्वात असल्याचे दिसून येते. तसेच शांताराम मोहीते यांचे वारसांचे नावे चार आणे क्षेत्र म्हणजेच ०–८८–० एवढे क्षेत्र सामाईकांत मालकी वहिवाटीत असल्याचे व त्याबाबत त्यांचा स्वतंत्र खातेउतारा अस्तित्वात असल्याचे दिसून येते. तसेच धनाजी मोहीते यांचे वारसांचे नावे चार आणे क्षेत्र म्हणजेच ०–८९–० एवढे क्षेत्र सामाईकांत मालकी वहिवाटीत असल्याचे व त्याबाबत त्यांचा स्वतंत्र खातेउतारा अस्तित्वात असल्याचे दिसून येते. तसेच जिल्हा परिषद रत्नागिरी यांचे नावे १ गुंठा क्षेत्र मालकी वहिवाटीत असल्याचे दिसून येते. सदरहू दावा मिळकतीच्या सात बारा रेकॉर्डवरुन दावा मिळकत ही सर्व सहहिस्सेदारांच्या सामाईक कब्जेवहिवाटीत असल्याचे दिसून येत नाही. याउलट, यशवंत, शांताराम व धनाजी यांच्या वारसांच्या नावे स्वतंत्र क्षेत्र मालकी वहिवाटीत असल्याचे दिसून येते. दावा मिळकत ही शांताराम, यशवंत व धनाजी यांच्या वारसांमध्ये सामाईकांत कब्जे

वहिवाटीत आहे हे दाखविणेकरीता साक्षीदारांचे प्रतिज्ञापत्राव्यतिरिक्त इतर कोणताही कागदोपत्री पुरावा वादीने दाखल केलेला नाही. प्रतिवादीनेही दावा मिळकत ही स्वतंत्र कब्जेवहिवाटीस असलेबाबत दाखविणेकरीता साक्षीदारांची प्रतिज्ञापत्र दाखल केलेली आहेत. वादी व प्रतिवादी यांचेतर्फे दाखल करणेत आलेली साक्षीदारांची प्रतिज्ञापत्रे ही वादी यांच्या कुटूंबातील लोकांचीच म्हणजेच दावा मिळकतीतील सहहिस्सेदारांची आहेत. वादी यांचे साक्षीदार यांनी दावा मिळकतीबाबत अद्याप वाटप झालेले नसल्याने दावा मिळकत ही सामाईकांत कब्जेवहिवाटीत असल्याचे शपथेवर कथन केले आहे. याउलट, प्रतिवादीचे साक्षीदार यांनी दावा मिळकतीबाबत वाटप झाले असल्याने दावा मिळकत ही शांताराम, यशवंत व धनाजी यांच्या वारसांमध्ये स्वतंत्र कब्जे वहिवाटीत आहे असे विरोधी कथन केले आहे. त्यामुळे साक्षीदारांच्या प्रतिज्ञापत्रांवर विसंबुन राहून निष्कर्ष काढणे उचित ठरणार नाही.

**१४.** वादीतर्फे दावा मिळकत ही सामाईकांत कब्जेवहिवाटीस असल्याबाबत इतर कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. याउलट, प्रतिवादी यांनी निशाणी २०/७ अन्वये दाखल केलेल्या कागदोपत्री पुराव्यावरुन वादीने शासकीय माता रमाई घरकूल योजनेअंतर्गत नविन घर बांधले त्यावेळी फक्त त्याची आई व भाउ म्हणजेच यशवंत मोहीते यांच्या वारसांची संम्मती घेतल्याचे दिसून येते. तसेच सदर संम्मतीपत्रामध्ये दावा मिळकतीपैकी क्षेत्र हे लिहून घेणार व देणार म्हणजेच वादी व त्याचे कुटूंबिय यांच्यात सामाईकांत वहीवाटीस असल्याचे नमूद केले आहे. यावरुन सात बारा रेकॉर्ड सदरी वादी व त्याच्या कुटूंबियांच्या नावासमोर नमूद केलेले क्षेत्र हे त्यांचे कुटूंबियांच्या स्वतंत्र मालकी वहिवाटीत असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते.

**१५.** वादी व प्रतिवादी यांच्या कथनावरुन तसेच अभिलेखावर असलेल्या

कागदोपत्री पुराव्यावरुन असे दिसून येते की शासनाकडून वळणे या गावी सर्व ग्रामस्थांना पाणीपुरवठा करण्याकरीता जलजिवन योजनेकरीता निधी मंजूर करण्यात आलेला आहे व सदर योजनेअंतर्गत दावा मिळकतीमध्ये विहीरीचे बांधकाम करण्यात आलेले आहे. विहीरीचे बांधकाम पूर्ण झाले आहे. सदर जलजीवन योजनेअंतर्गत पाईपलाईन जोडणी व वीजजोडणीचे काम फक्त अपूर्ण आहे. यावरुन सदर योजनेचे निम्म्याहून अधिक काम पूर्णत्वास गेलेले आहे. प्रतिवादी करीतअसलेले जलजीवन योजनेचे काम हे सर्व ग्रामस्थांच्या हितासाठी असले तरी त्यामुळे वादीवर अन्याय होणार नाही हे पाहणेही तेवढेच गरजेचे आहे. वादी व प्रतिवादी यांनी दाखल केलेल्या कागदोपत्री पुराव्यावरुन दावा मिळकत ही वादी व त्याचे सहहिस्सेदार यांचे समाईक कब्जेवहिवाटीत असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत नाही. याउलट दावा मिळकतीच्या सात बारा उता–यावरुन वादी व त्याचे कुटूंबियांचे वहिवाटीस स्वतंत्र क्षेत्र नमूद असल्याचे दिसून येते व ज्या सहहिस्सेदारांनी प्रतिवादी यांना जलजीवन योजनेसाठी बक्षिसपत्राने क्षेत्र दिले आहे त्याच्या कुटूंबियांच्या नावे स्वतंत्र क्षेत्र नमूद आहे. वादीतर्फे सात बारा रेकॉर्ड सदरी स्वतंत्र क्षेत्र नमूद केलेले असले तरी दावा मिळकत ही एकत्रात वहिवाटीस आहे असा युक्तीवाद करण्यात आला. परंतु सदर कथनाच्या पृष्ठ्यर्थ कोणताही पुरावा अभिलेखावर आणलेला नाही. प्रस्तुतकामी पुराव्याअंती वादी व त्यांचे सहहिस्सेदार यांचेमध्ये वाटप झाले नाही असे शाबीत झाल्यास सदरचे क्षेत्र वाटपास ज्या सहहिस्सेदारांनी बक्षिसपत्राने जलजीवन योजनेसाठी क्षेत्र दिले त्यांच्या हिश्यास घालता येईल. त्यामुळे सदर योजनेच्या अंमलबजावणीमुळे वादी यांचेवर अन्याय होईल असे दिसून येत नाही.

**१६.** तुर्तातूर्त ताकिदीच्या अर्जाचा विचार करतेवेळी समानतेच्या तत्वाचा विचार करणे आवश्यक आहे. वर नमूद केलेप्रमाणे सदर योजना राबवितेवेळी वादी यांचेवर अन्याय होणार

आहे असे दिसून येत नाही. याउलट सदर योजनेचा लाभ हा सर्व ग्रामस्थांना होणार आहे. जलजिवन योजनेचे निम्म्याहून अधिक काम पूर्णत्वास गेले आहे. अशा परिस्थितीत तुर्तातूर्त ताकिदीचा अर्ज मंजूर केलेस प्रतिवादी यांचे पर्यायी शासनाचे अपूर्णनीय नुकसान होणार आहे. तसेच वळणे गावातील ग्रामस्थांना सदर जलजिवन योजनेचा लाभ होण्यापासून वंचीत रहावे लागणार आहे असे प्रथमदर्शनी दिसून येते. समानतेच्या तत्वाचा विचार करता तुर्तातूर्त ताकिदीचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित ठरणार नाही.

**१७.** वरील विवेचनावरुन वादीस सकृतदर्शनी केस असल्याचे तसेच न्यायाचा तराजू वादीचे बाजुने असल्याचे शाबीत होत नाही. अशा परिस्थितीत तुर्तातूर्त ताकिदीचा अर्ज मंजूर झाल्यास प्रतिवादी यांचे म्हणजे वळणे गावातील ग्रामस्थांच्या हक्क अधिकारावर गदा येणार आहे. वरील सर्व कारणास्तव वादी हे प्रतिवादी विरुध्द तुर्तातूर्त ताकिदीचा अनुतोष मिळणेस पात्र नाहीत. सबब, मी मुद्दा क्र.१ ते ३ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवून मुद्दा क्र.४ करिता खाली आदेश पारित करीत आहे.

**– आदेश –**

वादीचा निशाणी ०५ चा अर्ज नामंजूर करण्यात येतो.

( सदरचा आदेश खुल्या न्यायालयात घोषित करणेत आला. )

सही/-

**दापोली.** **(श्रीमती.टी.एस. महाडिक)**

**दिनांक ३०/१२/२०२३.** **दिवाणी न्यायाधीश क.स्तर, दापोली.**

I affirm that the contents of the P. D. F. file order are same, word to word as per original Order.

| | |
|---|---|
| Court Name : | Smt. Tejaswini Sandeep Mahadik<br>Judicial Magistrate First Class,<br>Dapoli,Dist-Ratnagiri. |
| Name of Steno : | R.K.Sangare |
| Date of decision : | 30/12/2023 |
| Order signed<br>by Presiding Officer on : | 30/12/2023 |
| Order re-uploaded on : | 01/01/2024 |